TATA CONSUMER PRODUCTS LIMITED

# भारतीय ग्राहकांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी फ्लिपकार्ट आणि टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड यांचे भागिदारीत आगळेवेगळे वितरण सोल्युशन

- टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या वितरकांचे फ्लिपकार्ट बाजारपेठ विक्रेते म्हणून सामिलीकरण
- बंगळुरू, मुंबई आणि दिल्लीसारख्या शहरांमध्ये आवश्यक खाद्यपदार्थ व पेय उत्पादनांची उपलब्धता शक्य

**बंगळुरू, ११ एप्रिल २०२० :** कोव्हिड-१९च्या जागतिक साथीच्या संकटात भारतीय ग्राहकांना आवश्यक अन्न आणि पेय उत्पादने उपलब्ध करून देशाची सेवा करण्यासाठी संपूर्णत: भारतात विकसित ई-कॉमर्स बाजारपेठ असलेली फ्लिपकार्ट आणि टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड एकत्र आले आहेत. एका आगळ्यावेगळ्या, अशा प्रकारच्या पहिल्याच डिस्ट्रिब्युशन सोल्युशन अंतर्गत टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या वितरकांची फ्लिपकार्टच्या व्यासपीठावर विक्रेते म्हणून नोंदणी होईल. टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या वतीने देऊ करण्यात येणाऱ्या पेय (टाटा टी आणि कॉफी) आणि खाद्यपदार्थ (टाटा संपन्न मसाले, डाळी आणि पोषक मिश्रणे) उत्पादनांच्या विविध कॉंबो पॅक्सच्या खरेदीसाठी ग्राहक फ्लिपकार्टच्या व्यासपीठाचा वापर करू शकतात.

या भागिदारीमुळे दोन आयकॉनिक भारतीय कंपन्या एकत्र आल्या असून सध्याच्या काळात आपापल्या घरात राहून सोशल डिस्टन्सिंगचे पालन करणाऱ्या भारतीय ग्राहकांच्या गरजा भागवण्यासाठी आपल्या एकत्रित ताकदीचा वापर करून आगळेवेगळे असे वितरण प्रारूप त्यांनी तयार केले आहे.

फ्लिपकार्ट बाजारपेठेवर नोंदणी करण्यात आलेल्या टाटा कन्झ्युमर कंपनीच्या वितरकांना पॅकेजिंग आणि ऑर्डरच्या पूर्ततेसाठी फ्लिपकार्टचे प्रशिक्षण देण्यात आले असून फ्लिपकार्टच्या प्रमाणित परिचालन प्रक्रियेचा अवलंब करून ते ऑर्डर्सची प्रक्रिया करतील.

टाटा कन्झ्युमर कंपनीच्या वितरकांकडून ही अत्यावश्यक उत्पादने गोळा करून आणि आपल्या वितरक एग्झिक्युटीव्जच्या व्यापक यंत्रणेच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत त्यांचे वितरण करून फ्लिपकार्टच्या बाजारपेठेची पुरवठा साखळी या ऑर्डर्सची पूर्तता करेल. बंगळुरूत यापूर्वीच ही भागिदारी कार्यान्वित झाली असून येत्या आठवड्यात मुंबई व दिल्ली या शहरांमध्ये आणि भविष्यात दुय्यम पातळीवरील शहरांमध्ये ही सुविधा विस्तारित करण्याची या कंपन्यांची योजना आहे. भारतीय ग्राहकांच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन उत्पादनांचे मिश्रण तयार करण्यात आले असून त्याचवेळी त्यांच्या खर्चातही लक्षणीय बचत होणार आहे.

**फ्लिपकार्ट समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कल्याण कृष्णमूर्ती** म्हणाले, *"टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्ससमवेतची आमची भागिदारी म्हणजे सध्याच्या कठिण काळात देशाची सेवा करण्याची आमची संयुक्त महत्त्वाकांक्षा आणि जबाबदारी याचे द्योतक आहे. सरकार आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्यामुळे भारतातील विविध समुदायांना सेवा पुरवण्यासाठी उपयुक्त अशी आगळीवेगळी वितरण व*

*पुरवठा साखळी प्रारुपे तयार करणे आम्हाला शक्य होते. टाटा कन्झ्युमर आणि फ्लिपकार्ट या दोन्ही कंपन्यांमधील एकतानता आणि क्षमता परस्परपूरक असून आमच्या बाजारपेठ प्रारुपावर आधारित पर्यायी बिझनेस चॅनल अस्तित्वात आणून या कठिण कालावधीत ग्राहकांना अनमोल सेवा देताना आम्हाला अभिमान वाटतो."*

**टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील डीसुझा** म्हणाले, *"सध्याच्या कठिण काळातही देशभरातील आमच्या ग्राहकांना आमचे खाद्यपदार्थ व पेय उत्पादनांची उपलब्धता कायम राहील, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. फ्लिपकार्टसमवेतच्या या भागिदारीमुळे आमच्या व्यापक यंत्रणेद्वारे सक्षम अशी पर्यायी वितरण यंत्रणा उभारण्याची कल्पक अशी संधी आम्हाला मिळाली आहे. एकमेकांच्या सशक्त बाजूंचा वापर करून गरजू ग्राहकांपर्यंत आवश्यक वस्तू पोहोचवणे आम्हाला शक्य होत आहे, याचा आम्हाला आनंद आहे."*

फ्लिपकार्ट ही संपूर्णत: देशातच विकसित झालेली ई-कॉमर्स कंपनी असल्यामुळे तिला येथील स्थानिक वातावरणाची परिपूर्ण माहिती असून आपल्या पुरवठा साखळीचे परिचालन वाढवण्यासाठी तिने अनेक लक्षणीय पावले उचलली आहेत. सध्याच्या परिस्थितीत टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड समवेतची भागिदारी समयोचित असून या कठिण काळात ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यास त्यामुळे मदत होईल. शिवाय, ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू उपलब्ध करून देऊन सोशल डिस्टन्सिंगचे पालन करण्यास मदत करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांशीही हे सुसंगत आहे. टाटा समूहाचा भाग असलेली टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सची स्थापना टाटा ग्लोबल बेव्हरेजेस आणि टाटा केमिकल्स लिमिटेड या कंपनीचा ग्राहकोपयोगी उत्पादनांचा व्यवसाय यांच्या विलिनीकरणातून फेब्रुवारी २०२० मध्ये झाली आहे.

**About the Flipkart Group**
The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, driving access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India's fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

For more information, please contact media@flipkart.com

**About Tata Consumer Products Limited**
Tata Consumer Products Limited is a focused consumer products company uniting the principal food and beverage interests of the Tata Group under one umbrella. It was formed after a de-merger of the consumer products business of Tata Chemicals Limited into Tata Global Beverages Limited, under a Scheme of Arrangement which was sanctioned by the

Tribunal in January 2020, the Scheme is operational from February 7, 2020. The Company's portfolio of products includes tea, coffee, water, salt, pulses, spices, and ready-to-eat offerings. Tata Consumer Products is the 2nd largest branded tea company in the world and over 300 million servings of its beverage brands are consumed everyday across the globe. Its key beverage brands include Tata Tea, Tetley, Eight O'Clock Coffee, Tata Coffee Grand and Himalayan Natural Mineral Water. Its foods portfolio includes brands such as Tata Salt and Tata Sampann. In India, Tata Consumer Products has a reach of over 200 million households, giving it an unparalleled ability to leverage the Tata brand in consumer products. The Company has an annual turnover of ~Rs. 10,000 cr and employs 2,200+ people in its branded business workforce. For more information, please visit www.tataconsumer.com